Estd-1962
NAAC `A'Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शोध समिती,

## 'कुलगुरू' या पदासाठी अर्ज मागवीत आहे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरची स्थापना १९६२ साली झालेली असून हे पश्चिम महाराष्ट्रातील विद्यापीठांपैकी एक विद्यापीठ आहे. ह्या विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रात कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यांचा समावेश आहे. हे विद्यापीठ ८५३ एकर क्षेत्रात पसरलेले आहे. या विद्यापीठांतर्गत २९६ संलग्नित महाविद्यालये असून सुमारे अडीच लक्ष पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठात ४० विविध शैक्षणिक विभाग असून कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षण, सामाजिक विज्ञान, औषधनिर्माणशास्त्र आणि अभियांत्रिकी अशा विविध शाखेतून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. त्याचबरोबर नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, सोशल वर्क, रूरल स्टडीज इत्यादी नवीन अभ्यासक्रम सुरु केलेले आहेत. सर्व विद्याशाखांमध्ये विद्यापीठाने निवड आधारित श्रेणांक पध्दतीचे (Choice Based Credit System) अवलंबन केले असून परीक्षा पध्दतीमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा समावेश करून सुधारणा केलेल्या आहेत. विद्यापीठाने विविध राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांशी सामंजस्य करार केले आहेत. हे प्रतिष्ठित विद्यापीठ नॅक (NAAC) द्वारे 'ए' श्रेणीसह पुन:अधीस्वीकृत केले आहे. नुकतेच या विद्यापीठाने ISO 9001:2015 मानांकन प्राप्त केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये कुलगुरू निवडीसाठी पारदर्शी व वस्तुनिष्ठ पध्दतीची तरतूद करण्यात आली आहे. जी व्यक्ती विद्यापीठाचे रूपांतर एका शैक्षणिक व व्यावसायिक श्रेष्ठत्व केंद्रात करू शकेल असे उत्तम नेतृत्वगुण आणि प्रशासन कौशल्य असलेल्या ज्येष्ठ विद्याव्यासंगीची निवड करण्यासाठी या अधिनियमाची रचना करण्यात आली आहे.

कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल यांनी या विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी यथोचित व्यक्तीची शिफारस करण्यासाठी त्रिसदस्यीय शोध समिती तयार केली आहे. ही शोध समिती दिनांक २७ मे, २००९ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रानुसार कुलगुरूंच्या पदासाठी विहित केलेली अर्हता व अनुभव या अटींची पूर्तता करणाऱ्या तसेच, हे आव्हानात्मक काम करण्यास इच्छुक असलेल्या ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञांकडून नामनिर्देशने/निवेदन मागवीत आहे. या पदासाठी आवश्यक अर्हता व अनुभव, इष्टतम अनुभव आणि कौशल्ये व नैपुण्य याबाबतची आवश्यक ती तपशीलवार माहिती तसेच, अर्जाचा नमूना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या www.unishivaji.ac.in. या संकेतस्थळावर दिला आहे.

इच्छुक व्यक्तींनी आपला तपशीलवार गोषवारा, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमून्यात त्यांच्या/तिच्या उमेदवारीबाबतचे दोन पानी समर्थन, विद्यापीठाकरिता दोन पानी भविष्यलक्षी योजना (Vision) आणि त्यांच्या/तिच्या कार्याची नीट ओळख असलेल्या तीन नामांकित व्यक्तींची नावे/संपर्क माहितीसह सादर करावा. संस्थांना सुध्दा त्यांना योग्य वाटेल अशा उमेदवारांची नामनिर्देशने पाठवीता येतील.

शोध समितीने **श्री. आर. के. जैन, सायन्टिस्ट 'एफ'** यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

संबंधित उमेदवारांनी त्यांचा अर्ज/ नामांकन विहित नमून्यात चार प्रतीत व त्याच सोबत संगणकीकृत प्रत (Soft Copy) संपर्क अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०२ जुलै, २०२०** रोजी किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा रीतीने खालील पत्यावर पाठवावीत. त्यानंतर आलेले अर्ज/ नामांकन विचारात घेतले जाणार नाहीत.

| | | |
|---|---|---|
| ई-मेल | : | rk.jain67@gov.in |
| पत्ता | : | ॲडीशनल डायरेक्टर, डायरेक्टॉरेट ऑफ एच.आर.डी.<br>रूम नं. २४८, डी. आर. डी. ओ. भवन, न्यू दिल्ली - 110011 |
| भ्रमणध्वनी क्रमांक | : | 09717700664 |
| दूरध्वनी क्रमांक | : | 011-23007248 |

आवश्यकता भासल्यास शोध समिती, निवड सूचितील उमेदवारांना विचारांच्या आदान-प्रदानासाठी आमंत्रित करेल.

या माध्यमातून नवनवीन उपक्रम व संशोधन प्रकल्प राबवून संस्थेला उत्तुंग शिखरावर नेण्याची तसेच, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देण्याची ही शैक्षणिक प्रशासकांना सुवर्ण संधी आहे.

दिनांक : 03 /06/2020

**अध्यक्ष,**
शोध समिती